# दैनिक लोकांकीत

सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र

मुख्य संपादक-संजय पवार


## घोषणांचा सुकाळ, कामांचा दुष्काळ

**मुंबई**-शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या कारभारावर टीका केली आहे. महापालिकेच्या १०० दिवसांच्या कामकाजावर बोलताना दानवे यांनी 'घोषणांचा सुकाळ आणि कामांचा दुष्काळ यापलीकडे शहराच्या पदरात काहीच पडलेले नाही', अशा शब्दात प्रहार केला आहे. तसेच मनपा गटनेते गणेश लोखंडे यांनीही कामकाजावर ताशेरे ओढले आहेत.सत्ताधाऱ्यांच्या अपयशाची आणि खोटेपणाची ही तिखट उदाहरणे, असे म्हणत अंबादास दानवे यांनी काही मुद्यांवर लक्ष वेधले आहे. हेरिटेज वॉकचा सपशेल खोटा दावा: महापालिकेने स्वतः 'हेरिटेज वॉक' सुरू केल्याचे सांगतात. मात्र हे वॉक सुमारे दहा वर्षांपासून शहरात सुरू आहेत. महापालिका त्यात जाऊन बसली एवढंच.


• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/7448 • शुक्रवार दि.२२ मे २०२६ • अंक-११६ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.


# रेल्वे भरती आंदोलन ; राज ठाकरे यांची निर्दोष मुक्तता

**ठाणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासाठी आजचा दिवस अत्यंत दिलासादायक ठरला आहे. तब्बल १८ वर्षांपूर्वी संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या २००८ च्या रेल्वे भरती आंदोलन प्रकरणातून ठाणे सत्र न्यायालयाने राज ठाकरे यांची निर्दोष मुक्तता केली आहे. सरकारी पक्षाला न्यायालयात कोणताही ठोस पुरावा सादर करता न आल्यामुळे न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला, ज्यामुळे मनसैनिकांमध्ये सध्या प्रचंड उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे.हे प्रकरण २००८ साली महाराष्ट्रात झालेल्या रेल्वे भरती परीक्षेच्या वेळच्या हिंसक आंदोलनाशी जोडलेले आहे. रेल्वे भरतीमध्ये स्थानिक महाराष्ट्रीयन तरुणांना डावलून बाहेरील राज्यांतील, विशेषतः बिहार आणि उत्तर प्रदेशमधील उमेदवारांना प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप मनसेने केला होता. याविरोधात मनसे कार्यकर्त्यांनी कल्याण रेल्वे स्थानकावर उग्र आंदोलन केले. या आंदोलनाने पुढे हिंसक वळण घेतले, ज्यामध्ये अनेक परप्रांतीय उमेदवार जखमी झाले आणि पोलिसांसोबतही कार्यकर्त्यांची मोठी चकमक उडाली. या संपूर्ण प्रकारानंतर आंदोलनाला चिथावणी दिल्याचा ठपका ठेवत राज ठाकरे आणि इतर कार्यकर्त्यांवर दंगल घडवणे, बेकायदेशीर जमाव जमवणे आणि सरकारी कामात अडथळा आणणे यासारखे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले होते.

उत्तर भारतीय उमेदवारांना लक्ष्य केल्याच्या आरोपावरून राज ठाकरे आणि मनसे कार्यकर्त्यांवर राज्यभरात तब्बल ५४ गुन्हे नोंदवले गेले होते. जून २००९ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर राज ठाकरे यांचा अटकपूर्व जामीन रद्द झाला आणि त्यांना नाट्यमयरीत्या अटक करण्यात आली होती. त्यानंतर १ लाख रुपयांच्या जामिनावर त्यांची सुटका झाली असली, तरी कोर्टाची पायरी आणि कायदेशीर लढाई गेल्या १८ वर्षांपासून सुरूच होती.या प्रदीर्घ चाललेल्या खटल्याच्या अंतिम सुनावणीदरम्यान ठाणे सत्र न्यायालयाने सरकारी पक्षाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राज ठाकरे यांच्यावर असलेले चिथावणीखोर वक्तव्याचे किंवा दंगलीशी थेट संबंध असल्याचे आरोप सिद्ध करण्यासाठी सरकारी पक्ष न्यायालयात कोणताही ठोस आणि कायदेशीरदृष्ट्या भक्कम पुरावा सादर करू शकला नाही. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि कायदेशीर कागदपत्रे तपासल्यानंतर, न्यायालयाने पुराव्याअभावी राज ठाकरे यांची या गुन्ह्यातून सन्मानपूर्वक आणि निर्दोष मुक्तता केली. या ऐतिहासिक निकालामुळे राज ठाकरे यांच्या डोक्यावर टांगती असलेली कायदेशीर तलवार अखेर कायमची हटली आहे.



# अशोक कांबळे यांच्या हत्येचा तिव्र निषेध-केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले



**मुंबई । प्रतिनिधी**

रिपब्लिकन पक्षाच्या ठाणे शहर जिल्हा युवक कमिटीचे सरचिटणीस अशोक कांबळे यांच्यावरती जीवघेणा हल्ला करुन त्यांचा झालेल्या हत्येचा रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आम्ही तिव्र निषेध करीत आहोत. दिवंगत अशोक कांबळे यांच्या मारेक-यांना त्वरीत अटक करुन कठोरात कठोर शिक्षा केली पाहिजे अशी मागणी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केली.

ना. रामदास आठवले हे दिवंगत रिपब्लिकन कार्यकर्ते अशोक कांबळे यांच्या कुटुंबियांची लवकरच सांत्वनपर भेट घेणार आहेत. रिपब्लिकन वतीने दिवंगत अशोक कांबळे यांना जाहीर श्रद्धांजली वाहण्यात येणार आहे.

दिवंगत अशोक कांबळे रिपब्लिकन पक्षाचे ठाणे शहर जिल्हयातील युवा कार्यकर्ते होते. त्यांनी अनेक सामाजिक कार्यक्रमात भाग घेतला होता. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे आयोजन ते करीत होते. राम नगर ठाणे येथे त्यांच्या कामाचे कार्य होते. रिपब्लिकन कार्यकर्ता म्हणून त्यांची चांगली ओळख होती. त्यांच्यावर अचानक भ्याड हल्ला करुन त्यांची हत्या झाल्याची घटना अत्यंत दुःखद आणि मनाला वेदना देणारी आहे. त्यांच्या झालेल्या हत्येचा आपण रिपब्लिकन पक्षाच्या वतीने तिव्र निषेध करीत आहोत. तरी प्रशासनाने सर्व मारेक-यांना त्वरीत अटक करुन गुन्हेगारांना कठोरात कठोर शिक्षा केली पाहिजे अशी मागणी ना. रामदास आठवले यांनी केली आहे.

# नीट पेपर फूट प्रकरणातील मोटेगावकर क्लासेसच्या डेक्कन जिमखाना इमारतीवर कारवाई

### पुणे डेक्कन जिमखाना क्लासला परवानगीच नव्हती ।।। भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या संबंधित इमारतीच्या विनापरवानगी वापरामुळे पुणे महापालिका बांधकाम विभागाकडून कारवाई

**पुणे । रमेश जयस्वाल**

नीट पेपर फूटी प्रकरण देशात गाजत आहे यात महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थी बळीगेले आहे लातूर,नागपूर,पूणे अश्या अनेक ठिकाणचे महाभाग यात गूंतल्या कारणाने यांच्यावर कारवाई करून अटकही करण्यात आलेली आहे यात नीट परीक्षा प्रकरणातील मोटेगावकर क्लासेसच्या डेक्कन जिमखाना परिसरातील इमारतीवर भोगवटा प्रमाणपत्र नसल्या कारणाने संबंधीत इमारतीच्या विनापरवाना वापर बाबत पुणे महापालिकेच्या बांधकाम विभागाने कारवाईची प्रक्रीया सुरू केली आहे या इमारतीचा वापर परवानगीविना करण्यात येत होता यामुळे महापालिकेने महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम २६० (१)(अ) अन्वये नोटीस बजावत इमारत सील केली आहे शिवाजीनगर येथिल जंगली महाराज रोडवरील बोरावके टॉवर्स इमारतीत मोटेगावकर क्लास सुरू होते ही जागा निवासी सदानिकेच्या स्वरूपात मंजूर असतांनाही यांचा वापर व्यवसायिक वापर होतो या इमारती मधील पहिला मजला मधील शॉप क्रमांक एक याच प्रमाणे दुसरा व तिसरा मजला मध्ये मोटेगावकर क्लासेसच्या नावावर वापर केला जातो या बाबत महापालिकेला यांची फार वर्षा पासून जाणीव होती परंतू सर्व अर्थकारणातून आणि राजकिय दबावा पोटी कारवाई केली जात नव्हती याची




सुध्दा सखोल चौकशी होणे गरजेचे आहे या इमारतीला अद्याप भोगवटा प्रमाणपत्र महापालिकेने दिलेले नसतांनाही या जागेचा परस्पर वापर कसा केला जातो हे महापालिकेच्या अधिका-यांना माहित नव्हते काय ? शहरात अनेक ठिकाणी मोक्यांच्या जागेवर निवासी वापरासाठी मंजूर केलेल्या जागेमध्ये व्यवसायिक वापर होत आहे स्वारगेट, शिवाजीनगर, बाणेर, बालेवाडी, नाना पेठ, कोथरूड, सदाशिव पेठ आणि इतर मध्यवर्ती ठिकाणी अनेक क्लासेस सुरू आहे यातील अनेकांना परवानगी नसतांनाही क्लासेसच्या नावावर विद्यार्थ्यांशी खेळ करत यांचा गोरख धंदा सुरु आहे महापालिकेने मोटेगावकर क्लासेसवर कारवाई केली त्या इमारतीचे मालक जोशी यांच्यावरही कारवाई होणे गरजेचे आहे शिक्षण संस्थांच्या नावावर करत असलेला गोरख धंदा राजेरोसपणे सुरू आहे शहरातील अनेक ठिकाणी निवासी जागा मध्ये लहान मुलांच्या शाळा, टेविशन क्लासेस, व्यायाम शाळा , वाचमन साठीचे कार्यालय यावर महापालिकेचे दुर्लक्ष होत यांचा परीणाम शहराला भोगावा लागत आहे शहरातील मध्यवर्ती ठिकाणी अनेक क्लासेस नियमाबाह्य सुरू आहे यावर वेळीच प्रशासनाने लक्ष न दिल्यास अनेक प्रकारे परिणाम या पुढे भोगावे लागणार आहे अनेक क्लासेसला राजकीय वजन मिळत असल्या कारणाने आणि राजकीय समावेशामुळे असल्या क्लासेसच्या गोरखधंदा राजरोसपणे सुरू आहे गरीब आणि हूशार विद्यार्थी अनेक परिक्षेला सामोरे जाऊन परीक्षा देतात आणि दुसरी कडे पेपर फोडून लाखो रूपये कमविणारे असल्या क्लासेस वाले लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळत करत आहे यात अनेक राजकिय , क्लास चालवणारे यांचे प्रशासकीय अधिकारी यांच्या सोबत अर्थकारण होत असल्या कारणाने ही बाब आता तरी कोठे तरी थांबविणे आवश्यक आहे नाहीतर विद्यार्थांचे भविष्याशी खेळ असाच सुरू राहणार तसेच यात लाखो रूपये देऊन पेपर खरेदी करणा-यावरही कारवाई होणे आवश्यक आहे.

# दि.बा.पाटील ते नाना शंकरशेट; सन्मानासाठी जनतेची हाक

**रायगड (ओमकार नागावकर)–** सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकरण प्रकरणात थेट हस्तक्षेप करण्यास नकार देत याचिका फेटाळून लावली. नामकरणाचा अधिकार सरकारचा आहे, असे स्पष्ट करत न्यायालयाने निर्णय राज्य आणि केंद्र सरकारवर सोपवला. या निर्णयानंतर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीसाठी सुरू असलेला संघर्ष पुन्हा तीव्र झाला आहे.याच पार्श्वभूमीवर आता मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकाला भारतीय रेल्वेचे जनक मानले जाणारे जगन्नाथ नाना शंकरशेट यांचे नाव देण्याची मागणीही जोर धरू लागली आहे. सामाजिक संस्था, इतिहास अभ्यासक आणि नागरिकांकडून सरकारने नाना शंकरशेट यांच्या योगदानाचा सन्मान करावा, अशी भूमिका घेतली जात आहे.


**भूमीपुत्रांमध्ये संताप**

नवी मुंबई उभारण्यासाठी हजारो शेतकरी आणि प्रकल्पग्रस्तांनी स्वतःच्या जमिनी दिल्या. त्याग, संघर्ष आणि आंदोलनांतून हा प्रकल्प उभा राहिला; मात्र आज त्याच भूमीपुत्रांच्या नेत्याला सन्मान देण्यात सरकारकडून टाळाटाळ होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. राज्य आणि केंद्र सरकारने अनेकदा आश्वासनं दिली, प्रस्ताव मंजूर झाल्याच्या बातम्याही झळकल्या; मात्र प्रत्यक्षात लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ अशी अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही. त्यामुळे भूमीपुत्रांचा वापर फक्त निवडणुकांसाठी केला जातो का? असा संतप्त सवाल आता उघडपणे विचारला जात आहे.

**नाना शंकरशेट यांच्या नावासाठीही जनतेची धडपड**

दरम्यान, मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानकाला भारतीय रेल्वेचे जनक म्हणून ओळख असलेल्या नाना शंकरशेट यांचे नाव मुंबई सेंट्रल टर्मिनसला देण्यासाठीही अनेक वर्षांपासून मागणी सुरू आहे. मुंबईत पहिली रेल्वे सुरू करण्यासाठी मोठे आर्थिक आणि सामाजिक योगदान देणाऱ्या नाना शंकरशेट यांनी ब्रिटिश काळात भारतीयांच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

१८५३ मध्ये मुंबई ते ठाणे दरम्यान धावलेल्या भारतातील पहिल्या रेल्वे प्रकल्पासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात पाठबळ दिले होते. शिक्षण, महिला शिक्षण, सामाजिक सुधारणा आणि सार्वजनिक विकासकामांमध्येही त्यांचे योगदान मोलाचे मानले जाते. त्यामुळे रेल्वेचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाच्या




नावाने मुंबईतील मुंबई सेंट्रल टर्मिनस स्थानकाचे नामकरण व्हावे, अशी भावना नागरिकांत आहे. विविध सामाजिक संघटना, इतिहासप्रेमी आणि काही राजकीय नेते सातत्याने सरकारकडे निवेदने देत आहेत. मुंबई सेंट्रलला नाना शंकरशेट टर्मिनस किंवा नाना शंकरशेट मुंबई सेंट्रल असे नाव देण्याची मागणी अधिक तीव्र होत असून, सरकारने इतिहासातील योगदानाचा योग्य सन्मान करावा, महाराष्ट्र राज्य सरकारने १२ मार्च २०२० रोजी नामकरणाचा प्रस्ताव मंजूर करुन केंद्र सरकार कडे पाठवला त्याला सहा वर्ष झालीत अजूनही प्रलंबित आहे. त्यासाठी मागणी केली जात आहे.

**आंदोलनाचा इशारा**

स्थानिक संघटनांनी सरकारला स्पष्ट इशारा दिला आहे की, दि. बा. पाटील विमानतळ नामकरणाचा निर्णय आणि मुंबई सेंट्रलला नाना शंकरशेट यांचे नाव देण्याबाबत सकारात्मक पावले उचलली नाहीत, तर राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल. रायगड, पनवेल, उरण, नवी मुंबई तसेच मुंबई परिसरात संतापाची लाट उसळली असून सरकारविरोधात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

**निर्णय सरकारच्या गोटात**

प्रकाशज्योत सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विकास पाटील यांनी ही याचिका दाखल केली होती. याआधी २०२५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयानेही याचिका फेटाळली होती. सर्वोच्च न्यायालयानेही हस्तक्षेप नाकारल्याने आता अंतिम निर्णय राज्य आणि केंद्र सरकारने घ्यायचा असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे सरकार आपला शब्द पाळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# संभाजी चौकात वडवणी पोलिसांची धडक कारवाई

## प्रतिबंधित गुटख्यासह युवक जेरबंद; मोटरसायकलसह ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी पोलिसांनी अवैध गुटखा विक्रेत्यांविरोधात मोठी कारवाई करत संभाजी चौक परिसरातून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा जप्त केला आहे. या कारवाईत एका युवकाला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून मोटरसायकलसह एकूण ५० हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

१६ मे रोजी दुपारच्या सुमारास वर्षा व्हगाडे यांना गोपनीय माहिती मिळाली होती की, संभाजी चौक परिसरात एक इसम मोटरसायकलवरून प्रतिबंधित गुटखा विक्री करत आहे. माहितीची खातरजमा होताच वडवणी पोलिसांनी तात्काळ पथकासह घटनास्थळी धाड टाकली. यावेळी संशयित इसमाच्या



मोटरसायकलवर ठेवलेली पिवळ्या रंगाची गोणी तपासण्यात आली. तपासणीदरम्यान त्यामध्ये डायरेक्टर, आरएमडी, सिग्नेचर, गोवा आदी विविध कंपन्यांचा महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला व मानवी आरोग्यास घातक असलेला गुटखा मोठ्या प्रमाणात आढळून आला.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपी राहुल साहेबा मोरे (वय २७) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडील हिरो होंडा स्प्लेंडर (MH12 FB 1324) मोटरसायकलसह गुटख्याचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करून न्यायालयाने त्याला १८ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही कार्यवाही अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कार्यवाहीत वडवणी ठाण्याचे ए पी आय वर्षा व्हगाडे, पी एस आय श्याम गायकवाड, पोलीस अंमलदार दादा उबाळे, कल्याण जावळे व अमीर सय्यद यांनी सहभाग घेतला.

# कोकणदर्शनमधून करूया सफर संगमेश्वरची!

## २२ मे रोजी आकाशवाणी रत्नागिरी केंद्रावरून प्रसारण

**संगमेश्वर । सत्यवान विचारे**

आकाशवाणी रत्नागिरी केंद्रावर प्रसारित होणाऱ्या कोकण दर्शन या कार्यक्रमातून संगमेश्वरची सफर श्रोत्यांना घडणार आहे. २२ मे रोजी या कार्यक्रमाचं प्रसारण होणार आहे. आकाशवाणी रत्नागिरी केंद्रावरून पर्यटनावर आधारीत कोकण दर्शन हा कार्यक्रम दर शुक्रवारी सकाळी ८.४० मिनिटांनी प्रसारित होतो. यावेळी या कार्यक्रमात संगमेश्वर तालुक्यातील धार्मिक स्थळे याविषयीची माहिती आणि तिथली संगमेश्वरी बोली याचा आनंद श्रोत्यांना घेता येणार आहे. या कार्यक्रमाचं लेखन सोनाली सावंत यांनी केले असून, निवेदन आणि निर्मिती सहाय्य सोनली सावंत आणि वंदना मुसळे यांच आहे. कार्यक्रमाचे सादरकर्ते विवेक वानखडे आहेत. श्रोत्यांना हा कार्यक्रम ११४३ Khz या मध्यमलहरी वाहिनीवर आणि १०१.५ Mhz या एफ. एम. वाहिनीवर तसंच newsonair या लाईव्ह मोबाईल अँपवर ऐकता येईल. प्रसारण झाल्यानंतर हा कार्यक्रम airratnagiri या यू ट्यूब चॅनलवर ही उपलब्ध होईल.

# काँग्रेसच्या उत्तर रायगड जिल्हा अध्यक्षपदी डॉ.मनीष पाटील

## महेंद्रशेठ घरत यांनी केले अभिनंदन!



**उलवे । प्रतिनिधी**

रायगड जिल्हा हा छत्रपती शिवाजी महाराज यांची पावन भूमी आहे. राजकारणातील सारीपटात काँग्रेसने वरिष्ठ पातळीवर दक्षिण रायगड आणि उत्तर रायगड असे रायगड जिल्ह्याचे दोन तुकडे केले आहेत. त्यामुळे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष म्हणून डॉ. मनीष पाटील आणि दक्षिण रायगडचे जिल्हाध्यक्ष म्हणून राजाभाऊ ठाकूर यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. मनीष पाटील हे सध्या रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य आहेत. त्यामुळे काँग्रेसचे रायगडचे मावळते जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी 'सुखकर्ता' बंगल्यावर डॉ. मनीष पाटील यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# उरण मध्ये औषध विक्रेत्यांचा बंद सर्वच स्तरातून मिळाला पाठिंबा

**उरण । विठ्ठल ममताबादे**

ऑनलाइन विक्री होत असलेल्या शेड्युल औषधांविरुद्ध, तसेच तरुण पिढीला सहज डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन शिवाय उपलब्ध होत असलेल्या नशा येणाऱ्या औषधांच्या , ऑनलाइन सहज उपलब्ध होणाऱ्या अँटिबायोटिक्स औषधांचा अनियमित वापर आणि त्यामुळे होणारे रेजिस्टन्स बाबत जनहितार्थ रुग्णांच्या भल्यासाठी २० मे रोजी पूर्ण भारतभर औषध विक्रेत्यांनी बंद पुकारला गेला होता.

त्यास सहयोग म्हणून केमिस्ट अँड डिस्ट्रिब्युटर्स असोसिएशन रायगड डिस्ट्रिक्ट (सी डी ए आर डी ) चे अध्यक्ष लीलाधर पाटील आणि जिल्हा सचिव प्रवीण नावंदर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याकडून आलेल्या सूचनानुसार उरण तालुका केमिस्ट्री डिस्ट्रीब्यूशन असो.उरण




तालुका ने औषध विक्री बंद पुकारला होता . ऑनलाइन डुप्लिकेट औषध विक्रीच्या संकटासमोर आपला व्यवसाय अबाधित राखण्यासाठी तसेच सर्व जनतेचा स्वास्थ्यासाठी सभासदांनी एकजुटीने उभे राहिले . उरण मधील सर्व १२० मेडिकल बंद मध्ये सामील झाले होते.याचा काही अंशी नियमिय औषधे हवी असणाऱ्या रुग्णांना फटका बसला .परंतु ज्या रुग्णांना अत्यावश्यक औषध हवी होती त्यांना औषधे पुरवण्याची व्यवस्था संघटनेचे पदाधिकारी यांनी केली होती त्यामुळे कुठेही बंद मुळे अत्यावश्यक औषधे हवी असलेल्या रुग्णांस त्रास जाणवला नाही.रायगड जिल्हा केमिस्ट असोसिएशन चे पदाधिकारी मनोज ठाकूर ,उरण तालुका अध्यक्ष उमाकांत पानसरे ,उरण तालुका सचिव राजेश्वर गावंड यांनी या संदर्भात माहिती दिली.

या बंदमुळे काही अंशी रुग्णांची गैरसोय झाली परंतु पुढच्या पिढी च्या भल्यासाठीच नशेची औषध आणि अँटिबायोटिक्स तसेच विशिष्ट प्रवर्गातील औषधे जे डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन शिवाय देऊ शकत नाही तीऔषधे विक्री ऑनलाइन बंद होणे आवश्यक आहे ,त्या साठी हा एकदिवसीय लाक्षणिक बंद पुकारला होता असे रायगड जिल्हा संघटनेचे पदाधिकारी मनोज ठाकूर यांनी सांगितले.

# नवी मुंबई जिल्हा कॉंग्रेसचे नवनिर्वाचित अध्यक्ष दळवी यांचे नवी मुंबई विमानतळावर जंगी स्वागत

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

नवी मुंबई जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी रामचंद्र दळवी यांची नियुक्ती झाल्यानंतर पक्षातर्फे नुकतीच अधिकृत यादी आणि परिपत्रक जारी करण्यात आले. या नियुक्तीनंतर नागपूर येथील पक्षकार्याचा दौरा आटोपून नवी मुंबईत परतलेल्या रामचंद्र दळवी यांचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जल्लोषात स्वागत केले. अधिकृत नियुक्ती आणि परिपत्रक: कॉंग्रेस पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरून नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पदासाठी रामचंद्र दळवी यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली. यासंदर्भात पक्षाने अधिकृत यादी आणि परिपत्रकही जारी केले आहे. नागपूर दौरा: जिल्हाध्यक्ष पदाची धुरा हाती घेतल्यानंतर लगेचच रामचंद्र दळवी हे कॉंग्रेस पक्षाच्या महत्त्वाच्या कामानिमित्त नागपूर दौऱ्यावर गेले होते. विमानतळावर जल्लोषात



स्वागत: नागपूरचे कामकाज आटोपून दळवी यांचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाले. यावेळी त्यांच्या स्वागतासाठी कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. पुष्पगुच्छ देऊन त्यांचे दणक्यात स्वागत करण्यात आले. उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्ते: या स्वागत समारंभाला नवी मुंबई जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अनेक महत्त्वाचे नेते उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने: नासिर हुसेन राष्ट्रीय प्रवक्ते संतोष सुतार (उपाध्यक्ष, नवी मुंबई जिल्हा कॉंग्रेस कमिटी) तुकाराम कदम (कार्यअध्यक्ष) संतोष पाटील (ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष) डॉ विजय पाटील युवा कोकण संघटक डॉ.विनोद पाटील ओबीसी सचिव महाराष्ट्र आणि यांनी उपस्थिती दर्शवली याशिवाय शेकडो निष्ठावान कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.नवनिर्वाचित अध्यक्षांचा संदेश: कार्यकर्त्यांनी दिलेल्या या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल रामचंद्र दळवी यांनी सर्वांचे मन:पूर्वक आभार मानले. तसेच, उपस्थितांना मार्गदर्शन करताना सर्वांनी मिळून कॉंग्रेस पक्षाचे काम अधिक जोमाने आणि एकजुटीने पुढे नेऊया असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला.रामचंद्र दळवी यांच्या नियुक्तीमुळे नवी मुंबई कॉंग्रेस कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर उत्साह निर्माण झाला असून, आगामी काळात नवी मुंबईत कॉंग्रेस पक्ष अधिक आक्रमकपणे आणि सक्षमपणे उभा राहील, असा विश्वास या स्वागत समारंभातून व्यक्त करण्यात आला.

## माथाडी मंडळात हमालांच्या मुलांना प्राधान्य द्या; अन्यथा तीव्र राज्यव्यापी आंदोलन उभे करू–साथी लोमटे

**पनवेल । प्रतिनिधी**

राज्यातील ३६ माथाडी मंडळे ही हमाल कष्टकऱ्यांच्या घामाच्या पैशावर चालत असल्याने मंडळातील नोकर भरती प्रक्रियेत हमालांच्या मुला–मुलींना प्राधान्याने नोकऱ्या द्याव्यात, अशी मागणी महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे सरचिटणीस साथी सुभाष लोमटे यांनी राज्य सरकारकडे केली आहे. तसेच सरकारने केवळ आश्वासनांपुरतेच मर्यादित न राहता प्रत्यक्ष निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही माथाडी कामगार नेत्यांनी दिला आहे.

मुंबईतील मजीद बंदर स्टेशनजवळील कै. माजी आमदार अण्णासाहेब पाटील सभागृहात नुकतीच माथाडी कायदा बचाव कृती समितीची बैठक पार पडली. माजी आमदार नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांच्या पुढाकाराने झालेल्या या बैठकीला मुंबईतील माथाडी कामगार नेते गुलाबराव जगताप, बळवंतराव पवार, अरुण रांजणे, निवृत्ती धुमाळ, पोपटराव देशमुख यांच्यासह महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळाचे

**माथाडी मंडळाचा संपूर्ण कारभार हा हमाल कष्टकऱ्यांच्या घामाच्या पैशातून चालतो. त्यामुळे मंडळातील नोकर भरती – प्रक्रियेत हमालांच्या शिक्षित मुला–मुलींनाच प्राधान्य मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. सरकारने दिलेली आश्वासने तातडीने प्रत्यक्षात उतरवावीत, अन्यथा राज्यातील माथाडी कामगारांना आपल्या हक्कासाठी आंदोलन करावे लागेल.**

**–गुलाबराव जगताप माथाडी कामगार नेते.**



उपाध्यक्ष राजकुमार घायाळ, विकास मगदूम, सहचिटणीस हनुमंत बहिरट, शिवाजी शिंदे, गोरख मेंगडे, हुसेन पठाण, चंद्रकांत मानकर, चंदन कुमार, विष्णू गर्जे आदी उपस्थित होते.

राज्य शासनाच्या कामगार विभागाने माथाडी व सुरक्षा रक्षक मंडळासाठी निरीक्षक, लेखापाल आणि लघुटंकलेखक पदांच्या भरतीसाठी नुकतीच जाहिरात प्रसिद्ध केली आहे. या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीत माथाडी कायद्याच्या स्थापनेत कै. अण्णासाहेब पाटील व डॉ. बाबा आढाव यांचे योगदान अधोरेखित करण्यात आले. तसेच हमालांच्या लेव्हीमधूनच मंडळांचा संपूर्ण कारभार चालत असल्याने सरकारवर कोणताही आर्थिक भार पडत नाही, त्यामुळे या भरतीत हमालांच्या शिक्षित मुला–मुलींना प्राधान्य देणे अनिवार्य असल्याची भूमिका मांडण्यात आली. बैठकीत नरेंद्र पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी माथाडी कामगारांच्या मुलांचा प्राधान्याने विचार केला जाईल, असे आश्वासन दिल्याची माहिती दिली.

## रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त अंधशाळेतील विद्यार्थी व कर्मचारी यांना शुक्रवारी मिष्ठान्न वाटप

**मुंबई । प्रतिनिधी**

दानशूर लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त एन एस डी औद्योगिक अंधशाळा, कॉटन ग्रीन मुंबई येथील अंधशाळेतील विद्यार्थी व कर्मचारी यांना शुक्रवार दिनांक २२ मे रोजी दुपारी बारा वाजता मिष्ठान्न देण्यात येणार आहे. भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित आमदार प्रमोद जठार हे याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या संदर्भात बोलताना शिवनेर संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र विश्वनाथराव वाबळे म्हणाले की, लोकनेते रामशेठ ठाकूर हे एक आदर्श व्यक्तिमत्व आहे. त्यांनी अनेक शिक्षण संस्था उभ्या केल्या आहेत. पुन्हा या हाताने दिलेले दुसऱ्या हाताला कळू नये अशी त्यांची दानशूर वृत्ती आहे. रामशेठ यांना उदंड आयुरारोग्य लाभावे अशी आमची



ईश्वरचरणी प्रार्थना आहे. म्हणूनच त्यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त शिवनेर संस्थेच्या वतीने आम्ही अंध बांधवांसाठी सुग्रास भोजनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

# देशसेवेबरोबर गावसेवेचा ध्यास!

## आर्मी जवान रंगनाथ चिरके यांच्या प्रयत्नांना यश;उपळी फाट्यावर बसथांबा व आरक्षण सुविधेमुळे प्रवाशांना दिलासा

### ऑनलाइन आरक्षण सुविधेचाही लाभ घ्यावा

**उपळी फाट्यावरून आता मुंबई, पुणे, भुसावळ, जळगाव, अहिल्यानगर आदी लांब पल्ल्याच्या प्रवाशासाठी आरक्षण सुविधाही उपलब्ध झाली आहे. प्रवाशांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या चडळढउ ई़ी ठशीर्शीरींळेप अ‍ॅपद्वारे ऑनलाइन तिकीट बुक करावे.ऑनलाइन आरक्षणामुळे संबंधित बस उपळी फाट्यावर अधिकृतपणे थांबण्यास मदत होणार असून, सर्वसामान्य प्रवाशांनाही याचा मोठा लाभ मिळणार आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने प्ले स्टोअरवरून या अ‍ॅप डाउनलोड करून ऑनलाइन तिकीट बुकिंगचा वापर करावा.**

**–रंगनाथ चिरके, आर्मी जवान**

**बीड । शंकर जाधव**

वडवणी तालुक्यातील उपळी हे जिल्हा परिषद सर्कलचे मोठे गाव असून, गेल्या अनेक वर्षांपासून गावात बससेवेचा अभाव होता. त्यामुळे जेष्ठ नागरिक, महिला, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांना रिक्षा अथवा पायदळ प्रवास करावा लागत होता. वाढत्या प्रवासखर्चामुळे नागरिकांच्या खिशाला मोठी कात्री बसत होती. मात्र देशसेवा करत असतानाच गावसेवेचे भान जपणारे उपळी गावचे सुपुत्र तथा आर्मी जवान रंगनाथ चिरके यांनी सामाजिक बांधिलकी जपत उपळी फाट्यावर बसथांबा व बससेवा



सुरू करण्यासाठी मोठा पाठपुरावा केला.अनेक निवेदने, सततचा पाठपुरावा आणि प्रशासनाशी समन्वय साधत अखेर उपळी फाट्यावर बससेवा सुरू करण्यात त्यांना यश आले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे आता उपळी व परिसरातील नागरिकांना प्रवासासाठी मोठा दिलासा मिळाला आहे. गावातील विद्यार्थ्यांपासून ते जेष्ठ नागरिकांपर्यंत सर्वच स्तरातून रंगनाथ चिरके यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.देशाच्या सीमेवर उभा राहत मातृभूमीचे रक्षण करणाऱ्या जवानाने आपल्या गावातील नागरिकांच्या समस्याही तितक्याच संवेदनशीलतेने ओळखून त्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतल्याने परिसरात त्यांच्या कार्याबद्दल अभिमान व्यक्त केला जात आहे. गावातील विविध विकासकामांसाठीही त्यांनी पुढाकार घेत अनेक कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे.

**गावातील नागरिकांना प्रवासासाठी होणारा त्रास पाहून सर्वसामान्य माणसाला कमी खर्चात सुरक्षित प्रवासाची सुविधा मिळावी, यासाठी प्रयत्न केले. उपळी व परिसरातील नागरिकांनी उपळी फाट्यावरून बसने प्रवास करून या सुविधेचा लाभ घ्यावा.**

# आमच्या हक्काचा पैसा द्या नाहीतर मुंबईत आमच्या समाध्या बांधा!

## निवृत्त बेस्ट कर्मचाऱ्याच्या पत्नीचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना हृदयद्रावक पत्र; रखडलेल्या पैशांसाठी आर्त हाक

**मुंबई । प्रतिनिधी**

ही तक्रार नाही... तर एका पत्नीच्या काळजाचा आक्रोश आहे. अशा शब्दांत एका निवृत्त बेस्ट कर्मचाऱ्याच्या पत्नीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे न्यायाची याचना केली आहे. तब्बल २८ वर्षे मुंबईची सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्याला त्याच्या हक्काचे पैसे मिळत नसल्याने कुटुंबावर उपासमारीची वेळ आल्याचे या पत्रातून समोर आले आहे.

निवृत्त बस वाहक महेश सदाशिव दाभोळकर यांच्या पत्नी सौ. छाया महेश दाभोळकर यांनी लिहिलेल्या या पत्राने बेस्ट कर्मचाऱ्यांच्या रखडलेल्या देयकांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे. आमच्या हक्काचा पैसा द्या, नाहीतर मुंबईच्या मुख्य चौकात आमच्या समाध्या बांधा, अशी संतप्त आणि वेदनादायी मागणी त्यांनी सरकारकडे केली आहे.

पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, महेश दाभोळकर यांनी १९९२ च्या दंगलींपासून ते कोरोना काळापर्यंत जीवाची पर्वा न करता मुंबईकरांची सेवा केली. मुंबई धावत राहिली कारण माझ्या पतीसारख्या हजारो कामगारांनी स्वतःचं आयुष्य पणाला लावलं, असे त्या म्हणतात.

मात्र आज त्याच कर्मचाऱ्याच्या घरात आर्थिक विवंचना, औषधांसाठी पैसे नसणे आणि लेकींची रखडलेली लग्ने यामुळे संपूर्ण कुटुंब खचून गेले आहे. केवळ चार हजार रुपयांच्या पेन्शनमध्ये वृद्ध दाम्पत्याला जगणे कठीण झाले असून, पतींच्या ग्रॅच्युइटी आणि रजा रोखीचे लाखो रुपये गेली सात-आठ वर्षे अडकून असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.ज्या हातांनी मुंबईला सावरलं, तेच हात आज औषधांसाठी थरथरत आहेत, अशी वेदना त्यांनी पत्रात व्यक्त केली आहे. आर्थिक तणावामुळे पती मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या खचल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

सर्वात धक्कादायक म्हणजे, आपल्या लेकींची लग्ने पैशाअभावी रखडल्याने समाजात होणारी थट्टा आणि अपमान सहन करावा लागत असल्याची खंत त्यांनी मांडली आहे. एका आई-वडिलांसाठी स्वतःच्या लेकीला असं कोमेजताना पाहणं म्हणजे जिवंतपणी मरण, असे भावनिक शब्द त्यांनी पत्रात लिहिले आहेत.सरकारने जर प्रामाणिक कर्मचाऱ्याला त्याच्या हक्काचा पैसा देऊ शकत नसेल, तर मंत्रालयासमोर किंवा गेट वे ऑफ इंडिया येथे आमच्या समाध्या बांधा, अशी संतप्त मागणी त्यांनी केली आहे.हे पत्र मुख्यमंत्री कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका, बेस्ट प्रशासन तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठविण्यात आले आहे. दरम्यान, बेस्टमधील निवृत्त कर्मचाऱ्यांचे रखडलेले देयके, अपुरी पेन्शन आणि आर्थिक अडचणी यामुळे अनेक कुटुंबे संकटात असल्याची चर्चा पुन्हा रंगू लागली आहे.एका निवृत्त कर्मचाऱ्याच्या पत्नीचा हा आक्रोश आता केवळ एका कुटुंबाचा प्रश्न राहिलेला नसून, संपूर्ण व्यवस्थेसमोर उभा राहिलेला मानवी संवेदनांचा प्रश्न बनला आहे.






**ठाणे : दिव्यातील साबेगावची आई गावदेवी चिचूआईचा ३ रा वर्धापनदिन सोहळा मोठया उत्साहात संपन्न झाला. देवीची महापूजा, अभिषेक व महाआरती व सायं ४.३० ते ९ वा. – आईचा पालखी सोहळा रात्री महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी साबे ग्रामस्थ मंडळाच्या वतीने सर्वांना आमंत्रीत करण्यात आले होते. ( फोटो – संतोष पडवळ )**

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान आयोजित महालक्ष्मी सरस उमेद ला रुग्ण मित्रांची सदिच्छा भेट

**मुंबई । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता गटातील महिलांच्या कर्तृत्वाचे, कौशल्याचे आणि उत्पादित मालाचे सरस प्रदर्शन व विक्रीस उत्स्फूर्त प्रतिसाद महाराष्ट्राच्या कानाकोप-यातून आलेल्या उमेदच्या ताईंनी आपल्या कलाकुसर, चवदार पदार्थ, आणि दर्जेदार उत्पादनांनी मुंबईकरांची मने जिंकली आहेत . हा केवळ एक बाजार नसून, महिला सक्षमीकरणाचा आणि ऊर्जेचा एक अनोखा मेळा होता .रविवार ,दिनांक १७ मे २०२६ रोजी डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार सचिव, ग्रामविकास व




पंचायतराज विभाग यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.रुग्ण मित्र साथी विनोद साडविलकर,मनिषा साडविलकर, कमलेश साळकर ,किरण साळवे, शौर्य साळवे, संतोष वेंगुर्लेकर, यश वेंगुर्लेकर, भक्ती वेंगुर्लेकर इ.नी सदिच्छा भेट दिली.महारष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानचे सीईओ निलेश सागर,मुख्य परिचालन अधिकारी निखिल ओसवाल व विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांच्या उत्तम नियोजनातून महालक्ष्मी सरस उमेद कार्यक्रम यशस्वी संपन्न झाला.

# ठाण्यातील गावदेवी मार्केटला लागलेल्या भीषण आगीत २ कर्मचाऱ्यांचा मृत्यू तर २ जखमी

## मृत्तांच्या नातेवाईकांना प्रत्येकी १० लाखांची मदत











**संतोष पडवळ । ठाणे**

३:४३ वाजताच्या सुमारास गावदेवी भाजी मार्केट इमारत, गोखले रोड, नौपाडा, ठाणे, (प.) या ठिकाणी गावदेवी भाजी मार्केटमध्ये भीषण आग लागली होती सदर घटनास्थळी नगरसेवक संजय वाघुले, नौपाडा रक्षक प्रमुख किरण नाकती, अतिरिक्त आयुक्त रोडे, उपआयुक्त गोदेपुरे, दिनेश तायडे, श्रीमती. मिताली मॅडम, मुख्य अग्निशमन अधिकारी झळके, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी एस. वाय. तडवी, नौपाडा पोलीस कर्मचारी, महावितरण कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान ०५- फायर वाहनासह, ०३- जम्बो वॉटर टँकर, ०२- वॉटर टँकरसह, ४ -रेस्क्यू वाहनासह व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१- पिकअप वाहनासह, ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान -१ पिकअप वाहनासह, ठा.म.पा. रुग्णवाहिका -३, १०८ रुग्णवाहिका, खाजगी वॉटर टँकर उपस्थित होते.सदर घटनेत दोन जखमी १) श्री. सुजित पष्टे (पु/ वय ४५ वर्षे, ठा. म. पा. अग्निशमन केंद्र, स्थानक अधिकारी ) २) श्री. समीर जाधव (पु/ वय ४० वर्षे, ठा. म. पा. अग्निशमन केंद्र, तांडेल तर सदर घटनेमध्ये १) श्री. काळू शंकर गाडेकर (पु/ वय-५३ वर्षे, ठाणे महानगरपालिका, आरक्षक) २) श्री सागर शिंदे. ( पु/ वय ४३ वर्षे, ठा. म. पा. अग्निशमन केंद्र, स्थानक अधिकारी) मृत्यूमुखी पडले.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटिंग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफीस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५